# " गरवारेच्या सुकन्यांची महिला सर्व्हिसींग सेंटरला भेट "

सांगली दि. २१/०३/२०२२ :

कोरोनाचे संकट, लॉकडाऊनमुळे हरवलेला रोजगार या सर्व संकटावर मात करीत सांगलीतील शामरावनगरमध्ये चार महिलांनी थेट दूचाकी, चारचाकी वाहनांसाठी सर्व्हिसिंग सेंटर सुरु केले आहे. पुरुषांचे वर्चस्व असलेल्या या क्षेत्रात महिलांनी टाकलेले हे पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांच्या कुटुबासाठी आधार बनले आहे. या सर्व्हीसींग सेंटरमध्ये महिला कशा प्रकारे कामकाज करतात हे पाहण्यासाठी श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली मधील राष्ट्रीय सेवा योजना व कॉमर्स विभागातील विद्यार्थिनींनी भेट दिली. रुबीना मुजावर, सुमैय्या बागणीकर, आसमा शेख, गीता गायकवाड, रेश्मा इ. महीला अत्यंत सफाईदारपणे दूचाकी चारचाकी वाहने धुण्याचे काम करतात.

कोरोना काळात महिलांना जगण्याचा मार्ग हे सर्व्हिसींग सेंटर दाखवित आहे. हे गॅरेज सुरु करण्यासाठी अकबर मुजावर यांनी प्रोत्सहन दिले आहे. गॅरेजच्या संचालिका रुबिना मुजावर आहेत. काम करणा-या महिलांशी विद्यार्थीनीनी संवाद साधला व त्यांची कार्यपध्दती प्रत्यक्षात जाणून घेतली. कार्यक्रमाचे संयोजन प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सांगली मिरज विभागाच्या विभागीय समन्वयक डॉ. उर्मिला क्षीरसागर, डॉ. व्ही. एस. गायकवाड कॉमर्स विभाग प्रमूख, प्रा. धनश्री देशपांडे, प्रा. सुनीता नाईक यांनी केले. परिस्थितीशी लढून जिंकणा-या महिलांचे अनोखे कार्य सुकन्यांसाठी आदर्शवत असेच आहे.

---

संदर्भ/केएम/न्यूज फाईल/ 813

प्रति,

दि. २१/०३/२०२२

मा. संपादक,

दैनिक- सकाळ, लोकमत, पुण्यनगरी, त.भा. - सांगली.

महोदय,

वरीलप्रमाणे आमच्या महाविद्यालयाची बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून कृपया प्रसिध्द करावी ही विनंती.

कळावे.

डॉ. आर. जी. कुलकर्णी
प्राचार्य